# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/01/2024 (सोमवार) दुपार

---

## जनावराची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत पोलीस चौकी सावरगाव हद्दीतील सावरगाव ते सोनोली रोड वर सोनोली शिवारात एक पिवळया रंगाची दस चक्का गाडी क्रमांक MP- 09/HG 0325 मध्ये वाहन चालक याने जनावरे कोंबून नेत असल्याबाबतची माहिती मिळाल्याने, पोलीस स्टेशन नरखेड, वाहतूक शाखा ना. ग्रा. आणि पोलीस ठाणे काटोल येथील स्टॉफच्या मदतीने सदर ठिकाणी नाकाबंदी करून सदर वाहन थांबविले असता सदर वाहनाची पाहणी केली असता वाहना मध्ये एकूण ४४ बैल गोरे व एक मृत गोरा असे एकूण ४५ काळे पांढरे लाल रंगाचे गोरे मिळून आल्याने बैल गोरे यांना मालापूर तह नरखेड येथील गोवंश शाळा मध्ये ठेवले असून बैल गोरे यांचा उपचार सुरू आहे तसेच एक बैल गोरा यांचा उपचार सुरू आहे. वाहन चालका विरुद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## घरफोडी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावर ईसापुर मौदा येथे दिनांक ०६/०१/२०२४ चे २१.३० वा. ते दिनांक ०७/०१/२०२४ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रफुल बळिराम मेहर, वय ३२ वर्ष, रा. ईसापुर ता. मौदा जि. नागपुर हे आपले परीवारासह घरीच जेवण वगैरे करून झोपी गेले त्यानंतर दिनांक ०७/०१/२०२४ चे सकाळी ०५/०० वा. दरम्यान फिर्यादी नेहमी प्रमाणे झोपेतुन उठले असता फिर्यादीला घराचे मागील असलेल्या किचनचा दरवाजा हा उघडा दिसला व दरवाज्याचे कडी कोंडा हा तुटलेला दिसला फिर्यादीचे पाठीमागेच फिर्यादीची पत्नी नामे —सौ. आरती हि सुध्दा उठली व फिर्यादीने पत्नीला दरवाजा उघडा असल्याबाबत व दरवाज्याचे कडी कोंडा हा तुटलेला असल्याचे सांगीतले तेव्हा दोघांनी मिळुन घराची पाहणी केली असता घराचे किचनरूमला लागुन असलेला बेडरूममधील एक लोखंडी अलमारी ही उघडी दिसली व त्यामधील सामान हे जमीनीवर अस्ताव्यस्त पडलेले दिसले म्हणुन लोखंडी आलमारीची आणखी पाहणी केली असता त्यामधील लॉकर मध्ये ठेवलेले फिर्यादीचे आईचे जुने वापरते सोन्याचे १) ४४ लहान मोठे सोन्याचे मणी असलेली एकदानी वजनी ६ ग्रॅम किंमती १८०००/—रू ची २) खिचडी पोत वजनी ५ ग्रॅम किंमती १५०००/—रू ची ३) डोरले ४ ग्रॅमचे किंमती १२०००/—रू चे असे एकुण ४५०००/—रूपयाचे सामान हे चोरीस गेल्याचे दिसुन आले. तसेच कोणीतरी अज्ञात चोराने गावातीलच राहणारे सुधाकर रामचंद्र जाणे वय ४८ वर्ष रा. ईसापुर याचे घरी सुध्दा घराचे मागील दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन आतमध्ये प्रवेश करून घरामध्ये ठेवलेल्या लोखंडी पेटीतील त्यांचे आईचे जुने वापरते १) सोन्याचे कानातील टॉप्स वजनी ३ ग्रॅम किंमती ९०००/—रू चे व २) खिचडी पोत ४ ग्रॅम ची किंमती १२०००/—रू ची एकुण २१,०००/—रूपये असे एकुण किंमती ६६०००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी यांनी भेट दिली असुन तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार आंधळे मो. नं. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावर मौजा करंभाड शिवार दिनांक ०६/०१/२०२४ चे १८.०० वा. ते दिनांक ०७/०१/२०२४ दरम्यान फिर्यादी नामे— रमेश गोवीदराव मेंघर, वय ४० वर्ष, वार्ड नं. १ करंभाड व त्याचे गावातील लोकांनी आपआपले घरासमोर उभे करून ठेवलेल्या ट्रॅक्टरच्या बॅटरीचे बॉक्सचे नट कशाच्या तरी साहायाने उघडुन त्यामध्ये ॲमरॅन कंपनीच्या असलेल्या ४ ट्रक च्या ४ बॅटऱ्या प्रत्येकी किंमती ३०००/— रू प्रमाणे असा एकुण १२०००/— रू किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार अशोक उईके यांनी भेट दिली असुन तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अशोक उईके, मो. नं. ९३७३६५१४७१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर